# बासरी

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**बासरी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# बासरी

# १

'सिंदीया' कंपनीची 'सरस्वती' नावाची आगबोट कराची बंदराच्या दिशेनं जलमार्ग कापीत चालली होती... आता थोड्याच वेळात बोट बंदराला लागणार होती. सामानसुमान आवरून उतरण्यासाठी तयार होऊ पाहणाऱ्या केबिनमधल्या आणि डेकवरच्या उतारूंची धांदल उडाली होती. कुणी इकडे तिकडे धावपळ करीत होते, कुणी एकमेकाना उंच आवाजात हाका मारीत होते, बायका कलकलाट करीत होत्या, लहान मुलं रडत भेकत होती, गंमत बघायला म्हणून वडील माणसानी धरलेले हात सोडून धावत पळत होती, मोठ्या माणसांच्या शिव्या खात होती, क्वचित एखाद दुसरा रट्टाही... आता बोट केव्हा एकदा बंदराला लागते अशा उतावळीनं गजबजाटानं बोटीवरचं सारं वातावरण भरून गेलं होतं.!...

मुंबईहून निघाल्यापासूनचा दोन दिवसांचा तो प्रवास ज्यानी आरामशीरपणे केबिनमधे केला होता तेही उतारू आपापलं सामान काढून डेकच्या कठड्याला टेकून उभे होते... या मंडळीत इतरापासून दूर एकटाच सुमारे तीस वर्षांचा एक तरुण धूम्रपानाची मजा घेत, सकाळची कोवळी उन्हं अंगावर घेत उभा होता... आपल्याच विचारात मग्न असल्याप्रमाणे... बंदराच्या दिशेनं पुढे पुढे सरकणाऱ्या बोटीच्या गतीनं सुखावल्याप्रमाणे... बोट बंदराकडे सरकत नसून बंदराचा भूभागच बोटीच्या भेटीसाठी जवळ जवळ येतो आहे असा जो भास होण्यासारखा होता त्या भासाची मौज घेत असल्याप्रमाणे...

सकाळच्या पहिल्या प्रहरातल्या धुक्याचा पडदा गेल्या घटकाभरात विरून गेला होता. सूर्यकिरणांचा तांबुस सोनेरी प्रकाश हळूहळू वाढला होता. आता बंदर

तर स्पष्ट दिसू लागलं होतंच, परंतु शिवाय बुरखा टाकून प्रगट होणाऱ्या जनान्यातल्या स्त्रियांप्रमाणे कराची शहरातल्या उंचउंच इमारतीदेखील धुक्याचा पडदा दूर करून प्रगट होत होत्या. ठायी ठायी इमारतींच्या सौधांची, मनोऱ्यांची, घुमटांची, मंदिरांच्या शिखरांची, आणि वृक्षांच्या माथ्यांची शान झळाळू लागलेली दिसत होती. क्वचित कुठून तरी कुणीकडे तरी जाणाऱ्या विमानाची आकृती माथ्यावर दिसत होती, आणि त्याच्या पंख्यानी फाडलेल्या हवेचे टार टार आवाज कानात भरत होते...संमर्दापासून दूर एकीकडे सिगरेट ओढीत उभ्या राहिलेल्या त्या तरुणाची नजर वरच्या विमानाकडे गेली, आणि त्याच्या मनात आलं, फाळणीनंतर झपाट्यानं बदलेल्या कराची शहराच्या जीवनाची ही एक झलकच जणू आपल्या दृष्टीस पडत आहे!....गेल्या अडीच वर्षात पश्चिम पाकिस्तानच्या या राजधानीत आणखी कोणकोणते बदल झालेले आपल्याला दिसणार आहेत कोण जाणे?....

बोटीच्या डेकवरून त्याला कराची शहराचं जे दर्शन घडत होतं, ते नवं नव्हतं...ते मनोरे, ते घुमट, ती शिखरं नवी नव्हती. आजच्या सूर्यप्रकाशात जशी ती झळाळत होती तशीच पूर्वीदेखील वर्षानुवर्षं ती झळाळली होती. बोटीतून कराचीला येणाऱ्या मुशाफिरांच्या दृष्टीस ती अशीच वर्षानुवर्षं पडत राहिली होती. परंतु दूर अंतरावरून दिसणारा शहराचा हा मुखवटा जसाच्या तसा राहिला असला, तरी पाकिस्तानाचं स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आल्यानंतरच्या अडीच वर्षात कराची शहराचं अंतरंग पार ढवळून निघालं होतं, बदललं होतं... तो कराचीला येत होता तो हे सर्व जाणूनच. फाळणीपूर्वीचं कराची शहर आता जागेवर उरलेलं नाही, याची त्याला पूर्ण कल्पना होती. कराची शहरातल्या परिस्थितीत कोणते कोणते बदल झालेले आपल्याला दिसतील याचा त्याला चांगला अंदाज होता. कराचीला न जाण्याचा सल्ला त्याच्या मित्रांनी त्याला दिला होता... अडीच वर्षाची निराशा आणि दु:ख संपविण्याच्या आशेनं, जे त्याला शोधायचं होतं ते सापडेल अशी अपेक्षेनं तो निघाला होता. त्याची ती अपेक्षा बेहिशोबी होती, त्याची आशा वेडेपणाची होती, असं सांगणाऱ्या लोकांना तो मनातल्या मनात म्हणाला होता, माझ्या अंतकरणात गेली अडीच वर्षं जे दु:ख मी वागवलं त्याची तुम्हाला काय कल्पना? आणि कराची शहर कितीही बदललं असलं तरी माझ्या मनातला हेतू सफल झाल्यावाचून राहणार नाही, माझी खेप वाया जाणार नाही, अशी जी ग्वाही माझं मन मला देत आहे ती तरी



तुम्हाला काय माहीत?... अंत:करणाची जी ओढ त्याला लागली होती ती दुसऱ्याना सांगून समजण्यासारखी नव्हती. आणि शिवाय ती इतकी खाजगी आणि पवित्र होती की कुणाजवळ तिचा उच्चार करावा असंही त्याला वाटत नव्हतं. त्यानं अवश्य ती सारी तयारी केली होती, आणि दोन दिवसांपूर्वी सकाळी 'सरस्वती' बोटीत बसून तो निघाला होता... त्यानं मनोमन श्रद्धा ठेवली होती की आपली आशा सफल होईल...जे आपल्याला शोधायचं आहे ते सापडेल... आपली प्रीती खरी असेल, आणि खऱ्या प्रीतीत दिव्य शक्ती असते म्हणतात ते खरं असेल तर आपला शोध...

''क्यूं मकबूलभाई!''

पोटऱ्यांवर तंग बसलेल्या पांढऱ्या शुभ्र सुरवारीच्या रेशमी नाडीचे गोंडे झुलताना तलम मलमलीच्या खमीसाखाली दिसत आहेत, खमीसाच्या सैलसर बाह्य दणकट हातावर मुडपलेल्या आहेत, रुंद छातीवर खमीसावरचं गळ्यापासचं नक्षीकाम आणि सोन्याची बटण शोभत आहेत, डोळ्यात घातलेला सुरमा डोळ्यांच्या कडातून सांडत आहे, काळ्याभोर दाट केसांची झुलपं कपाळावर रूळत आहेत-अशा थाटातली, देवीच्या वणानी भरलेल्या चेहऱ्याची, गोबऱ्या नाकाची एक जाड जूड व्यक्ती हसत पुढे येत होती... तिच्याकडे बघून हसून मकबूलनं प्रश्न केला 'क्यूं करीमभाई?'

करीमभाईनं जवळ येताच त्याच्या खांद्यावर प्रेमानं हात टाकला आणि विचारलं, ''चहा झाला?''.... मकबूलनं 'हो झाला' म्हटल्यावर त्यानं चांदीची एक डबी उचलून पुढे केली आणि म्हटलं, ''लो, पान लो.''...हातातली सिगारेट दाखवीत मकबूल म्हणाला, ''नको, सिगारेटची मजा घेऊन राहिलो आहे.''...करीम म्हणाला, ''अरे भाई, हे पान तोंडात घालून ते चघळता चघळता सिगारेट ओढण्यात खरी मजा आहे. पानचा खुषबू तोंडात दरवळला की सिगारेटला एक न्यारीच लज्जत येते, बघ तरी?''...त्यानं एक पट्टी काढून ती मकबूलच्या तोंडात कोंबलीच आणि पान खाता खाता मकबूलनं सिगारेटचा दम मारला तेव्हा विचारलं, ''मी म्हणतो ते बरोबर आहे की नाही?''...मकबूलनं मान हालविली तेव्हा तो मोठ्यांदा हसला आणि म्हणाला, ''पान कसं खावं, सिगरेट कशी ओढावी, ही देखील एक कला आहे. माझ्याजवळ चार धडे घेशील तर ही कला तुला अवगत होईल, अरे भाई, किरकोळ व्यसनं करताना देखील माणसानं शास्त्रोक्तपणानं ती केली पाहिजेत! खरं की खोटं?'' ... मोठ्यांदा हसता हसता त्यानं मकबूलचा खांदा हालविला, आणि

डोळा घालून तो म्हणालो, ''मोठाली व्यसनं कशी करावीत त्याची देखील विद्या आपल्याजवळ भरपूर आहे बरं का!''

''हां हां करीमभाई, आपला अधिकार तर अविवाद्य आहे.'' असं मकबूल वरकांती हसून म्हणाला खरा, परंतु मनातल्या मनात त्यानं प्रार्थना केली की ही स्वारी आता दूर जाईल तर बरं होईल... खरं म्हणजे या घटकेला कुणाचीच संगत मकबूलला नको होती....जो हेतू धरून त्यानं कराचीला धाव घेतली होती, त्या हेतूच्या सिद्धतेसाठी कराची शहरात पाऊल टाकल्यावर काय करता येईल, कुठे कुठे जाता येईल, त्याचा विचार त्याला करायचा होता. त्यासाठी त्याला पूर्ण एकांत हवा होता. कुणाशी गप्पा माराव्या असं त्याला वाटत नव्हतं. करीमभाईचं साहचर्य तर त्याला अगदीच नको होतं. हा माणूस बोलण्या चालण्यात मोठा अघळ पघळ आणि स्वभावानं मोठा रंगेल आणि उदार असा त्याला वाटला होता. परंतु त्याची जानपछान वाढवावी असं त्याला वाटत नव्हतं...

बोटीवरच्या प्रवासात अनोळखी माणसांशी देखील काही निमित्तानं बोलणं निघतं, एकत्र खाणं पिणं होतं, परिचय वाढत जातो. मकबूलची करीमभाईशी ओळख झाली होती ती अशाच प्रकारची होती. 'कुठे कराचीला निघाला काय? कुठे राहणार? किती दिवस राहणार? बिझनेस करता की काय?' अशा ठरीव मामुली प्रश्नातून आणखी गप्पा निघाल्या होत्या... मकबूलनं जेव्हा करीमभाईला सांगितलं होतं की आपण बासरी वाजविण्यात निष्णात असून 'चांद फिल्म कॉपरेशन' नावाची जी कंपनी कराचीला निघाली होती त्या कंपनीच्या ऑर्केस्ट्रामधील बासरी वादकाची नोकरी आपण पत्करली आहे, आणि नोकरीवर रुजू होण्यासाठी आपण कराचीला जात आहोत, तेव्हा 'वाहवा! ही तर नामी बात तुम्ही सांगितली!' असा उद्गार काढून करीमभाईनं मोठी खुषी व्यक्त केली होती, इतकंच नव्हे तर कातड्याच्या सुंदर पेटीतली बासरी काढण्याचा आणि एखादी गत वाजवून दाखविण्याचा फार आग्रह त्याला केला होता... त्याच्या आग्रहाखातर मकबूलनं काल रात्री बासरी वाजविली होती... त्याचं बासरीवादन सुरू झत्तल्यावर इतस्तत: पथारीवर पसरलेले उतारू उठून बसले होते, हळू हळू जवळ आले होते, मकबूलच्या बासरीवादनाला मैफलीचं स्वरूप आलं होतं. सागरपृष्ठावरून बोट वेगानं चालली होती. बाहेर टिपूर चांदणं पडलं होतं, समुद्राच्या पाण्यावर चंदेरी प्रकाश झळाळत होता, भोवताली कोंडाळी करून बसलेले उतारू 'वाहवा!' 'अहाहा!' अशी दाद देत होते...



बासरीवादनात मकबूल स्वत: रंगून गेला होता... 'पिया को मिलनकी आस' या अखेरच्या गीताचे आर्त स्वर पहाटेच्या शांत वातावरणात घुमत राहिले होते... 'शाबाश! शाबाश!' म्हणताना करीमभाईनं मकबूलला डोक्यावर उचलून घेण्याचंच काय ते बाकी ठेवलं होतं... 'आता तुम्ही नोकरीनिमित्त कराचीला राहणार आहात. एकदा आमच्याकडे आलं पाहिजे तुम्ही. तुमच्यासाठी दावत देईन मी. एक रात्र मौज मजेत काढू आपण!' असं त्यानं मकबूलला आग्रहाचं आमंत्रण दिलं होतं...

''येईन. अवश्य येईन एक दिवस-'' असं मकबूलनं वचन दिलं होतं खरं, परंतु त्याप्रमाणे तो करीमभाईकडे मुळीच जाणार नव्हता... दोन दिवसांच्या प्रवासातल्या सहवासात या माणसाविषयी त्याचं मत काही चांगलं झालं नव्हतं. त्याचं बोलणं मोठं मिठास होतं, त्याच्या वागण्यात आदब भरपूर होती, तो वृत्तीनं जसा रंगेल होता तसाच मनानं मोठा उदार असल्याचं दिसत होतं; परंतु ज्याची ओळख वाढवावी असा तो नसल्याची शंका मकबूलला आली होती... बदललेल्या नव्या कराचीत चंगीभंगीपणा करणाऱ्या मुसलमानांची संख्या वाढली होती. फाळणीच्या धामधुमीत हिंदू व्यापाऱ्यांची जी लूटमार झाली होती तिचा फायदा उठवून किती तरी मुसलमान 'दादा' 'झटपट श्रींमता' च्या वर्गात प्रविष्ट झाले होते. त्यांच्या हातात पैसा खेळू लागला होता तेव्हा त्यांना आपले रंगेल षोक पुरवून घेण्याची इच्छा झाली होती. आणि त्यांच्या धर्मद्वेषाची विकृती अशी होती की बायका हव्यात परंतु त्या हिंदुंच्या हव्यात. मुंबईतल्या हिंदू बायका फुस लावून पळवायच्या, कराचीत आणायच्या, षोकीन मुसलमानांच्या घरात घालायच्या-अशा स्वरूपाच एक नवाच धंदा कराची शहरात तेजीला आला होता...करीमभाई हा असला धंदा करणाऱ्या लोकांपैकी असावा अशी शंका मकबूलला आली होती. त्या शंकेच्या अनुरोधानं त्यानं करीमभाईला प्रश्न केले होते, आणि त्या प्रश्नांची उत्तरं ऐकून त्याची शंका दृढ झाली होती... इतकंच नव्हे, तर करीमभाई आता कराचीला चालला होता तो देखील मुंबईतल्या चार बायका घेऊन चालला होता, आणि या पळविलेल्या बायका डेकवरच्या उतारूंच्या गर्दीत कुठे तरी होत्या, असाही संशय त्याला आला होता... त्यानं मनाशी ठरविलं होतं की प्रवासाच्या दोन दिवसात आपली आणि या माणसाची 'बेघडीची दोस्ती' झाली तेवढी बस झाली. पुन्हा याची गाठभेट नको, दर्शनदेखील नको....

आता ही पीडा दूर निघून जाईल तर बरं होईल अशी जी प्रार्थना मकबूल मनाशी करीत होता ती मंजूर होण्याचं काही लक्षण दिसेना... करीमभाई विचारू लागला, ''तुला घेण्यासाठी बंदरावर कुणी येणार आहे काय?''

मगबूल म्हणाला, ''नाहीं.''

''कुठे उतरायचं ठरविलं आहेस?''

''हॉटेलं काय थोडी आहेत? जिथे बरी सोय लागेलसं वाटेल तिथे–''

''अरे भाई, मग तू असं का नाही करीत? माझ्याकडे चल ना उतरायला.''

''हॅ! भलतंच काही तरी! तुमच्या ओळखीचा असा फायदा घेऊ?''

''वा भाई वा. ही काय बोलण्याची रीत झाली? अल्लाची कसम घेऊन सांगतो की आपल्याला तू फार आवडला आहेस. माझा घरी तू राहावंस असं मला फार वाटतं. तुझ्या राहण्या जेवण्याची दुसरी व्यवस्था झाली की तिकडे जा तू. पण तोपर्यंतच्या चार दिवसांची संगत सोबत मला दे की. अं?''

''नही नही करीमभाई, ऐसा हो सकता नही. तुम्ही मला आग्रहानं बोलविता याबद्दल फार आभारी आहे तुमचा. परंतु तुमच्या घरी उतरायला येणं माझ्यानं व्हायचं नाही.''

''अच्छा, मर्जी तुझी. पण एखाद्या चांगल्या हॉटेलात तुला घेऊन जाण्यासाठी तुझ्याबरोबर येऊ काय मी? आम्ही कराचीचे लोक मेहमानाला वाऱ्यावर सोडीत नसतो. येऊ का तुझ्याबरोबर?''

''नको नको करीमभाई. माझ्यासाठी तसदी घेऊ नका. शिवाय मला वाटतं तुमच्याबरोबर जनाना आहे–''

''अरे भाई, जनान्याची बात छोड दो. माझा धाकटा भाऊ बंदरावर येणार आहे. त्याच्या ताब्यात जनाना देईन, आणि हॉटेल दाखविण्यासाठी तुझ्याबरोबर येईन.''

''नको नको, करीमभाई. तुमची आणि तुमच्या जनान्याची ताटातूट करण्याचं पातक माझ्या हातून घडायला नको.''

मकबूलचा तो विनोद करीमभाईला फार आवडला. त्याला गदगदून हसू आलं. हसू ओसरेपर्यंत तो थांबला. पण मग त्यानं विचारलं, ''तुझ्या सामानात कांहीं बेकायदा वस्तू आहे काय? बंदरावरचे कस्टम खात्याचे लोक कधी कधी फार त्रास देतात, म्हणून विचारतो.''



मकबूल म्हणाला, ''ही सूटकेस, हा बिस्तरा, आणि माझ्या बासरीची ही पेटी, येवढंच माझं सामान. आंथरूण पांघरूण, आणि चार कपडे लत्ते. बस्स! बासरीसाठी तर आडवायचे नाहीत ना तुमचे कस्टमचे लोक?''

करीमभाई हसला आणि म्हणाला, ''वा भाई वा! आम्ही कराचीचे लोक इतके अरसिक झालो नाही अजून. स्वर्गीय संगीत ज्या बासरीतून निघंत त्या बासरीला जगात कुठे अटक असेल काय?''

बोट बंदराला लागल्याचा इशारा झाला....बोटीवरचे उतारू घाईघाईनं उतरू लागले....त्यानं पाहिलं तों करीमभाईचा भाऊ त्याला घेण्यासाठी आला होता. तो होता छोटा भाई, पण दिसत होता करीमभाईपेक्षाही अधिक दांडगा, वाकड्या तिकड्या ओघळलेल्या अंगाचा. आपला जनाना गोळा करून साऱ्या सामानासकट उतरण्याच्या धांदलीत असलेला करीमभाई मकबूलला दुरून दिसला. त्याची आणि आपली पुन्हा भेट होऊ नये अशी काळजी घेऊन मकबूल धक्क्याच्या दिशेनं भराभर पावलं टाकू लागला. तो मनाशी म्हणत होता, कराचीला तर येऊन पोचलो! आता जे हवं आहे, ते कुठे, असं आणि किती दिवसांनी सापडतं ते बघायचं....

कस्टमच्या तपासणी कचेरीत त्यानं आपला पासपोर्ट दाखविला.

''नाव?''

''मकबूल रहिमान.''

''धर्म?''

''मुस्लीम.''

''वय?''

''तीस.''

''धंदा?''

''फिल्म कंपनीत बासरी वादनाचा.''

''कराचीस येण्याचा हेतू?''

''नोकरी.''

''कुठे?''

''चांद फिल्म कॉपरेशनमधे.''

''किती दिवसासाठी आला आहात?''